
# दिवाळीनंतर दोन दिवसात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची आचारसंहिता

## मंत्री चंद्रकांत पाटलांनी सांगितला निवडणूक आयोगाचा प्लॅन

पुणे (सरकार) लोकसभा, विधानसभेपेक्षा नेत्याची खरी निवडणूक ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महापालिका असते. लोकशाही मधील सर्वात महत्त्वाची ही निवडणूक आहे. कदाचित आज (४ ऑक्टोबर) संध्याकाळपर्यंत जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होईल. आता कुणीतरी म्हणतील निवडणूक आयोगाशी दादांची चर्चा झाली वाटतं. मी ४० वर्षे यामध्ये घालवली त्यामुळे मी अंदाज मांडला आहे. दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता जाहीर होईल, त्यामुळे आपण निवडणुकीच्या तयारीला लागूया, असे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. आज भाजपचा विजयी संकल्प मेळावा पार पडला. या मेळाव्यात चंद्रकांत पाटील यांनी निवडणुकीसाठी कानमंत्र दिला.



चंद्रकांत पाटील म्हणाले की, २०१९ साली ज्यांचे तिकिट नाकारले त्या बावनकुळे यांना २०२४ च्या विधानसभा निवडणुकीचे उमेदवार ठरवण्याचे अधिकार मिळाले.निवडणूक ही फास्ट ट्रेन प्रमाणे आहे, प्लॅटफार्मवर जो राहील तो राहील. मात्र, नाराज होऊ नका. राजकारणात प्रयत्नाबरोबर नशीब देखील लागतं. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये मोठा फरक असला पाहिजे. २०१७ ची परिस्थिती बदला, त्यासाठी येणाऱ्या दिवाळीचा फायदा करून घ्या. लोकांना भेटून संपर्क वाढवा. निवडणूक महायुती म्हणून लढवायची आहे मात्र शेवटच्या क्षणी कोणता निर्णय घ्यायचा हे वरिष्ठ नेते ठरवतील, असे ते म्हणाले. आमच्या कोणत्याही कार्यकर्त्यावर अन्याय होऊ देणार नाही, असे ते म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना मागत असलेल्या ठिकाणी आपला चांगला उमेदवार असेल तर मैत्रीत लढू, पण कार्यकर्त्यांचा बळी दिला जाईल असं लढणार नाही, असेही त्यांनी सांगितले.



त्यांनी सांगितले २०१९ साली उध्दव ठाकरे यांनी थोडा समजूतदार दाखवला असता तर हे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शोधावं लागलं असतं, पण ते अडून बसले नाही, तर राज्यात चित्र वेगळं दिसलं असतं. नियती ही नियती असते, २०१९ साली सरकार जाणं हा नियतीचा खेळ आहे. २०१९ साली उद्धव ठाकरे यांनी हे सगळं करून काय मिळवलं? उतू नको मातू नको, घेतला वसा सोडू नको. निवडणुका होऊन जातील पण पार्टीसाठी काम करत राहील पाहिजे. मी कधीच कोणतं तिकिट मागितलं नाही, नेत्याची इच्छा म्हणजे कार्यकर्त्यांसाठी आज्ञा असल्याचे ते म्हणाले.


beedsarkar

संपादक-आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक ३४५ ■ शनिवार ४ ऑक्टोबर २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ ■ पाने ४ ■ किंमत १ रू.


Beed MAHARASHTRA ■ Year 12 ■ Issu 345 ■ Saturday 4 Octomber 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


## पहिली बायको सोडून गेली,दुसऱ्या बायकोवरही संशय

# बारसं होण्याआधीच लेकाला संपवत केली बापाने आत्महत्या

बीड (सरकार) नवरा-बायकोच्या भांडणात चार महिन्यांच्या चिमुरड्यालाही प्राण गमवावे लागले. बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील तलवाडा गावातील रामनगर येथील तीस वर्षीय तरुणाने चार महिन्यांच्या मुलाला पाण्याच्या बॅरेलमध्ये बुडवून ठार मारलं, त्यानंतर स्वतःही जीव दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील तलवाडा गावातील रामनगर येथे राहणारा अमोल हौसराव सोनवणे आणि पायल अमोल सोनवणे या नवरा बायकोने चार दिवसांपूर्वी घरगुती कारणावरुन विषारी औषध प्राशन केले होते. दोघंही यातून बचावले आणि उपचार झाल्यानंतर दसऱ्याच्या दिवशी आपल्या घरी परतले. मात्र पहाटे चार वाजताच्या सुमारास अमोलने आपल्या पोटच्या गोळ्याला - चार महिन्याच्या मुलाला पाण्याच्या बॅरेलमध्ये टाकले. त्यानंतर त्याने घरातच गळफास घेऊन स्वतःलाही संपवलं. अमोलचे याअगोदर एक लग्न झालं होतं. मात्र त्याच्या वागण्याला कंटाळून त्याची पहिली पत्नी काही महिन्यातच त्याला सोडून माहेरी निघून गेली होती. काही काळ गेल्यानंतर अमोलचं दुसरं लग्न झालं. दीड वर्षापूर्वी बीड जिल्ह्यातील आष्टी येथे राहणाऱ्या पायल हिच्याशी त्याचा दुसरा विवाह झाला. मात्र अमोल याच्या संशयी स्वभावामुळे पायल आणि अमोल यांच्यात सतत भांडणे होत असत. वादावादी सुरु असतानाच त्यांना मुलगा झाला.



दसऱ्याच्या काही दिवस आधी पायल आणि अमोल यांच्यात कडाक्याचं भांडण झालं. यात दोघांनीही विष प्राशन केलं. मात्र नातेवाईकांनी दोघांना तातडीने रुग्णालयात दाखल केलं. त्यांच्यावर उपचार झाले. दसऱ्याच्या तोंडावर ते घरी आले. घरी सर्वांसोबत त्यांनी दसरा साजरा केला. दुसऱ्या दिवशी पहाटे अमोलने बाळाला त्याच्या आईच्या कुशीतून अलगद उचलून पहाटे घरातील ड्रममध्ये बुडवलं. बाळाचा यात मृत्यू झाला. या मुलाचं बारसंही झालं नव्हतं. यानंतर अमोलने गळफास घेऊन स्वतःचा जीवही संपवला. अमोल ड्रायव्हर म्हणून काम करत होता. तो आई वडिलांचा एकुलता एक मुलगा होता, तर पायल ही गरीब घरातील असून तिला वडील नाहीत.

# ट्रकभर हळद गायब करून व्यापाऱ्याला ३७ लाखांचा गंडा

**ट्रकचालक आणि मालकावर अंबाजोगाईत गुन्हा**

अंबाजोगाई (सरकार): सांगलीला नेण्यासाठी ३० टन हळद दिली असता ट्रकमधील तब्बल ३७ लाख ८१ हजार रुपयांची हळद लंपास करून खोटी तक्रार दाखल करणाऱ्या ट्रक मालक आणि चालकावर अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत लोखंडी सावरगाव कळंब फाटा परिसरात घडली.

फिर्यादी प्रितेश दुर्गाप्रसाद सोनी हे छत्रपती संभाजीनगर येथील हे दुर्वा कमोडीटी प्रा. लि. या कंपनीचे संचालक असून, ते सांगली येथे हळद दळून विक्री करतात. त्यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी राधा सर्वेश्वर कंपनी सोलापूरमार्फत ३० टन हळद खरेदी करून स्टार ॲग्रो वेअरहाऊस, लिंबाळा (एमआयडीसी, हिंगोली) येथून सांगलीकडे पाठवण्यासाठी ट्रक क्रमांक एमएच २६ एडी २९३५ या वाहनाद्वारे वाहतूक ठरवली होती.

ट्रक मालक नदीम खान मुजाहेद खान (रा. अपना कॉर्नर, परभणी) आणि चालक सय्यद अजगर सय्यद सज्ञान (रा. दर्गारोड, परभणी) यांच्याकडे माल ताब्यात देण्यात आला. मात्र, सांगलीला पोहोचण्याआधी नदीमने सोनी यांना कळवले की अंबाजोगाईजवळ कळंब फाटा येथे अज्ञात लोकांनी ट्रक लुटल्याची घटना घडली आहे. त्यानंतर सोनी घटनास्थळी पोहोचले असता ट्रकमध्ये फक्त ३० पोते शिल्लक असून उर्वरित ५७० पोते हळद गायब असल्याचे दिसून आले. चौकशीत चालक सय्यद अजगरने कबुली दिली की ट्रक कोणत्याही चोरट्यांनी चोरलेला नसून ट्रकमालक नदीम खान यांनी संगणमत करून ट्रकमधील हळद कोठेतरी विल्हेवाट लावली व पोलीस ठाण्यात खोटी तक्रार दिली. या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात कलम ३१६(२), ३१६(३), ३१८(४), २१७, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास सपोनि जगताप हे करीत आहेत.

# माजी मंत्री रामदास कदमांना कोर्टात खेचणार

## अनिल परबांची पत्रकार परिषदेत माहिती

मुंबई (सरकार): सेनेचा दसरा मेळावा यंदा लक्षवेधी ठरला तो एकनाथ शिंदेंचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांच्या वादग्रस्त वक्तव्याने. शिवाजी पार्कवर शिवसेना ठाकरे गटाच्या उद्धव ठाकरेंचा दसरा मेळावा पार पडला. तर, नेस्को सेंटर येथे एकनाथ शिंदेंचा दसरा मेळावा संपन्न झाला. यावेळी शिंदेंच्या मेळाव्यामध्ये बोलताना रामदार कदम यांनी उध्दव ठाकरेंवर गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत. त्यावरती आज ठाकरे गटाकडून आमदार अनिल परब उत्तर देत आहेत. यावेळी बोलताना अनिल परबांनी रामदास कदमांचा कच्चाचिट्ठा काढला आहे. त्याचबरोबर रामदास कदमांच्या पुतण्याने स्वतःला का संपवलं? त्यांच्या बायकोने स्वतःला जाळून घेतलं, ते जाळून घेतलं? का तिला जाळलं, का काय झालं? हे देखील नार्कोटेक्समध्ये आलं पाहिजे. कोणाला बंगले बांधून दिले, खेडमध्ये त्या बंगल्यावरुन काय राजकारण झालं, काय गोंधळ झाला हे सगळं आलं पाहिजे, असे गंभीर प्रश्न आमदार अनिल परब यांनी उपस्थित केले आहेत.

त्याचबरोबर रामदास कदम यांनी केलेले आरोप खोडून काढताना अनिल परब म्हणाले, त्यांनी केलेले आरोप शंभर टक्के खोटे आहेत. मला एक गोष्ट सांगा की, बाळासाहेब यांना भेटायला असंख्य गर्दी होती. तुम्ही सगळे प्रेसवाले आहात कुठली बॉडी दोन दिवसासाठी ठेवता येते का? कुठलाही मृतदेह दोन दिवस शेवपेटीशिवाय ठेवता येऊ शकतो का? याबाबत कदमांची अक्कल गुडघ्यात आहे. त्यांना जे काय कुणी सांगितलं आहे, त्याने हे तरी विचार करायला पाहिजे होता किंवा रामदास कदम यांनी बोलताना विचार करायला पाहिजे होता. कुठलाही मृतदेह दोन दिवस शवघराशिवाय किंवा शवपेटीशिवाय ठेवता येतो का? कुठली इंजेक्शन दिली काही जरी केलं तरी असं करता येत का? कशी त्याची बॉडी ठेवू शकता येईल, दोन दिवस आणि त्यामुळे हे खोटे आरोप आहे



आणि रामदास कदम जे म्हणतात ना तुम्हाला माहिती आहे बाळासाहेब हयात असताना बाळासाहेबांनी स्वतःचे मोल्ड बनवले होते. हे मोल्ड कुठे ठेवले ते माहित आहे, आपल्याला माहीत असेल अंधेरीला स्टेडियम झालं, अंधेरीला सगळ्या क्रिकेट प्लेअर्स त्या वेळेला हे मोल्ड तिकडे बनवले होते, बाळासाहेबांच्या नंतर हे मोल्ड जे ठाकरे यांच्या मुख्यमंत्री निवासी वर्षा बंगल्यामध्ये जिथे उद्धव ठाकरे बसायचे त्याच्या पाठीमागे ठेवले, हे मोल्ड बाळासाहेबांच्या हयातीत बाळासाहेबांनी बनवलेले होते, असंही परब यांनी म्हटलं आहे.

पुढे अनिल परब म्हणाले, तिथे तेव्हा उपस्थित होते त्यांच्यापैकी शरद पवार आहेत ना..ते त्याचे उत्तर देवू शकतात नामिलिंद नार्वेकरही आहेत. कोण डॉक्टर आहे. ज्यांनी खोटी माहिती पसरवली त्यांना समोर आणा. पक्ष घेतला, माणसे घेतली पण तरीही काही होत नसल्याने आता बाळासाहेबांच्या मृत्यूचे राजकारण करत आहेत. तेव्हा असा एक प्रस्ताव आला की अँब्युलन्स द्वारे मृतदेह नेवून पार्कात दर्शनासाठी ठेवायचे. पण नंतर निर्णय बदलून अंत्ययात्रा काढण्याचा निर्णय झाला, असंही पुढे अनिल परब यांनी म्हटलं आहे.

# सोन्याची चैन चोरी करणारा पोलिसांच्या ताब्यात

## १ लाख ५२ हजाराचा मुद्देमाल हस्तगत;स्थानिक गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई

बीड (सरकार): नेकनूर पोलीस ठाण्याच्या पथकाने चोरी प्रकरणातील आरोपीला ताब्यात घेत मोठी कामगिरी केली आहे. मांजरसुंबा येथे मागील महिन्यात मनोज जरांगे पाटील यांच्या सभेत दीपक जोगदंड यांची सोन्याची चैन चोरीला गेल्या प्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अज्ञात चोरट्या विरोधात चोरट्या विरोधात गुन्हा क्रमांक २३०/२०२५, कलम ३०३(२) भा.दं.सं. अन्वये दाखल करण्यात आला होता.पोलिसांनी तपासी चक्रे फिरवून गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेतला असता गुप्त मिळालेल्या माहितीच्या आधारे खात्री झाल्यानंतरपकृष्णा वैजनाथ गुंजाळ (रा. माऊली नगर, बीड) यास पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून एकूण १२ ग्रॅम सोन्याची चैन, किंमत अंदाजे १,५२,०००/- रुपये असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस हवालदार १६०९ दुबाले, ४०२ मस्के, १३०२ गायकवाड, २०२९ सानप, पोलीस अंमलदार २२१५ अश्फाक, २२१० परजणे आणि २०६२ मांजरे यांनी सक्रिय सहभाग घेतला.हस्तगत मुद्देमाल व आरोपी यांना पुढील कार्यवाहीसाठी नेकनूर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. या यशस्वी कारवाईबद्दल नागरिकांकडून पोलीस पथकाचे अभिनंदन केले जात आहे.

### समुद्रात कमी दाबाचा पट्टा पुढील २४ तास धोक्याचे

मुंबई (सरकार) बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या प्रभावामुळे राज्यातील काही भागांत पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.







बीड : जिल्ह्याच्या माजी खासदार तथा अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या शिल्पकार स्व. केशरकाकू क्षीरसागर यांची १९ वी पुण्यतिथी निमित्ताने रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांचे कीर्तन आयोजित केले होते. स्व.केशरकाकूंना अभिवादन करण्यासाठी समाधीस्थावर जिल्हाभरातील सकाळपासून सर्व चाहत्यांनी गर्दी केली होती.




# संपादकीय

## राष्ट्र सर्वतोपरी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला आज शंभर वर्षं पूर्ण होत आहेत. राष्ट्रीय चरित्र निर्माण, सामाजिक आणि सांस्कृतिक जागरूकता आणि समाजातील सर्वात शेवटच्या पायरीवरील माणसाचे पुनरूत्थान या मार्गावर शंभर वर्षं काम केले आणि अजूनही तो काम करतोच आहे. आज देशभरात संघाच्या ५५ हजार शाखा आहेत आणि कोणत्याही राजकीय वादात न पडण्याची त्यांची भूमिका आजपर्यंत राहिली आहे. भारतीय जनता पक्ष या पक्षाचा तो पैतृक आहे. म्हणजे भाजपचा तो पिता आहे. पण इतक्यावरच त्याचे कार्य संपत नाही. समाजातील तळागाळातील लोकांचे कल्याण आणि सामाजिक समरसता यात संघ स्वयंसेवक स्वतःला वाहून टाकतात. गेल्या शंभर वर्षांत संघापुढे अनेक आव्हाने उभी राहिली आणि त्यातून तावूनसुलाखून पण आपले चरित्र न गमावता संघ तसाच मजबूत उभा आहे. संघाच्या कार्यशैलीवर वाद करत असतात आणि संघावर आक्रमक शैलीत टीका करत असतात. पण त्यांच्या टीकेत कधीही तथ्य आढळले नाही. संघावर पंडित नेहरूंच्या निधनानंतर त्यांच्या मृत्यूनंतर काही वर्षे बंदी आणली होती. १९४७ मध्ये एकदा आणि स्वातंत्र्योत्तर काळात संघावर तीन वेळा बंदी घालण्यात आली होती. कारण काँग्रेस सरकारला संघ नकोसा वाटत होता. संघावर नेहरूंपासून ते गांधी परिवारापर्यंत अनेकांनी फॅसिस्ट संघटना असे अनेक आरोप केले आहेत. पण काँग्रेसच्या त्या दाव्यांना कधीही सिद्ध करण्यात आले नाही आणि 'हाथी चले अपनी चाल'प्रमाणे संघ वाटचाल करतच राहिला. नथुराम गोडसे याने जेव्हा महात्मा गांधी यांची हत्या केली तेव्हा संघावर भारतीय सरकारने प्रथम बंदी आणली होती. नंतर इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात काँग्रेस सरकारने संघावर बंदी आणली. पण संघावर कोणताच आरोप कधीही सिद्ध झाला नाही. भारतातील अल्पसंख्याक वर्गाला खूश करण्यासाठी काँग्रेस सरकारने संघाला नेहमीच टार्गेट केले होते. पण कधीही काँग्रेस सरकार ते सिद्ध करू शकले नाही.

मध्यंतरी तर केवळ संघाशी संबंधित नाही म्हणून सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना तसे लिहून देण्याची सक्ती केली होती. काँग्रेसचा हा संघ स्वयंसेवकांबद्दलचा द्वेष यात दिसून आला. संघाच्या नेत्यांवर असा आरोप नेहमीच लावला जातो की त्यांनी आपल्या मुख्यालयात कधीही स्वातंत्र्य उत्सव साजरा केला नाही. पण तो केवळ आरोप होता. संघाने भारताचे राष्ट्रीय आणि सामाजिक अभिसरण हे कार्य सातत्याने संघाने केले आहे. संघाची स्थापना २७ सप्टेंबर १९२५ रोजी झाली आणि आज बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले आहे. पण संघाची जाज्वल्य निष्ठा आणि तळागाळातील वर्गाचे उत्थान हे कार्य अहोरात्र सुरू आहे. संघाचा सर्वात नेहमीच वाद राहिला होता तो कम्युनिस्ट पक्षांशी नंतर काँग्रेसशी. पण संघ या सर्वांना पुरून उरला आणि आज तर तो सत्ताधारी झाला आहे. म्हणजे संघाचे पदाधिकारी प्रत्यक्षात सत्तेत नसतात. पण भाजपला सत्तेत आणण्यासाठी ते प्रचंड कष्ट करतात आणि त्याचे फल त्यांना मिळते. संघावर अनेक आरोप करण्यात आले तसेच त्यांना फॅसिस्ट म्हणून हिणवण्यात आले तसेच संघाच्या स्वयंसेवकांना टार्गेट करण्यात आले. बाबरी मशिदीचे पतन असो किंवा गांधी हत्या असो. या काळात संघाला टार्गेट करून बंदी घालण्यात आली. यावेळी काँग्रेसचेच सरकार होते. पण संघाने सर्व आव्हानांना तोड देत आज आपले सर्वोच्च स्थान पटकावले आहे. संघ आज १०० वर्षं पूर्ण करत आहे. पण त्यांची पहिली शाखा नागपूरच्या मोहितेवाडा येथे भरवण्यात आली होती. आज त्या शाखेचा वटवृक्ष झाला आहे. आज संघाच्या जगभर शाखा आहेत आणि जगभर संघाचे स्वयंसेवक आहेत, तसेच संघात प्रत्यक्ष संबंधित नसले तरीही संघाप्रती सहानुभूती बाळगणारे आहेत. शंभर वर्षांपूर्वी स्थापन झालेला संघ नेहमीच टीकेच्या केंद्रस्थानी आहे. कधी त्याला फॅसिस्ट म्हणणे, तर कधी भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा केला नाही असे म्हणणे तसेच संघावर तर काँग्रेसने हिसाचार फैलावल्याचा आरोपही केला होता. पण यातील एकही आरोप सिद्ध होऊ शकला नाही आणि आज दिमाखात संघ शंभरावे वर्षं साजरे करत आहे. संघावर नेहमीच आरोप केला जातो की तो ब्राह्मण्यावादी संघटना आहे. पण संघाच्या शाखेत जा, कधीही तुम्हाला जातीभेद मानलेला दिसणार नाही. उलट संघाने समरसता शिबिरे भरवून समाजातील जातिभेद दूर केले आहे. किंबहुना तसे प्रयास केले आहेत. आज जग खूप जवळ आले आहे. त्यामुळे प्रत्येक संघटनेची आपली एक भूमिका घेणे आवश्यक आहे. ते कार्य संघ उत्कृष्टरीत्या पार पाडतो आहे असेच म्हणावे लागेल. जागतिक संदर्भ बाजूला ठेवून संघाला भारतापुरता विचार करून चालणार नाही आणि संघ ते करतो आहे. कारण हे ईश्वरदत्त कार्य आहे आणि ते पार पाडण्यासाठी संघ खंबीरपणे पाय रोवून उभा आहे. हेडगेवारांनी उभारलेल्या या शाखेचा एक वटवृक्ष झाला आहे आणि त्याची फळं भाजप ते संघाच्या अनेक शाखापर्यंत पोहोचली आहेत. आज शंभर वर्षांपूर्वी जग फारच बदलले आहे. अगदी शंभर वर्षांपूर्वीही जग होते तसेच ते राहिलेले नाही. महायुद्धानी जगाला बदलले तसेच आता होऊ घातलेल्या जागतिक संघर्षांनेही जगापुढे नवीन आव्हानात्मक स्थिती उभी केली आहे. तिला तोंड कसे द्यायचे याचे उत्तर संघाकडेच आहे. जेव्हा संघाची स्थापना झाली तेव्हा फक्त हिंदू राष्ट्र म्हणून उभारणी करायची असे संघापुढे आव्हान होते. आज ते आव्हान कित्येक पटींनी वाढले आहे. त्यामुळे संघाची जबाबदारीही वाढली आहे. आज मितीला संघ ही प्रचंड सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळ म्हणून समोर आली. अनेक आव्हाने परतवून सत्ता स्थापन केली, ती आपल्या अपत्याला म्हणजे भाजपला सत्तास्थानापर्यंत पोहोचवले आहे. पण एवढ्यापुरते संघाचे काम संपत नाही तर यापुढे सत्ता टिकवणे आणि काँग्रेसला नेस्तनाबूत करणे हे संघापुढचे आव्हान आहे. ही लढाई कधीही संपणार नाही. शंभर वर्षे हा तिच्या प्रवासातील एक पडाव आहे. यापुढेही संघाची वाटचाल अशीच चालू राहील यात काही शंका नाही. कारण नरेंद्र मोदी यांच्यासारखे पंतप्रधान भारताला लाभले आहेत.

# मनाचा मोठेपणा



शाळेत भाषण स्पर्धेचे आयोजन केले होते. विद्याधरने नेहमीप्रमाणे आपले नाव स्पर्धेसाठी दिले होते. गेली चार वर्षे विद्याधरच प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावत होता. यावर्षी 'छत्रपती शिवरायांचे स्वराज्य' या विषयावर स्पर्धकांना तीन मिनिटे बोलायचे होते.

विद्याधरने नेहमीप्रमाणे स्पर्धेची तयारी सुरू केली. विद्याधर वर्गातला हुशार आणि विनयशील विद्यार्थी. सर्वांशी प्रेमाने, नम्रतेने बोलणारा, सर्वांना मदत करणारा, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमात नियमितपणे भाग घेणारा! हे त्याचं स्पर्धेत भाग घेण्याचं पाचवं आणि शेवटचं वर्ष. यावर्षी प्रथम क्रमांकाचं पहिलं बक्षीस पटकावून तो दहा हजार रुपयांची घसघशीत कमाई करणार होता. यावर्षी दहावीची परीक्षा देऊन तो शाळेचा निरोप घेणार होता. शिवाय जाता जाता सलग पाच वेळा वक्तृत्व स्पर्धेचं बक्षीस पटकावून! स्पर्धेला केवळ चारच दिवस उरले होते. विद्याधरची पूर्ण तयारी झाली होती. विद्याधरच्याच मागे बसणारा अजिंक्य नावाचा त्याचा मित्र; तोही या स्पर्धेत नेहमी भाग घ्यायचा. पण विद्याधर पहिला आणि अजिंक्य नेहमीच दुसरा! त्यामुळे अजिंक्यच्या मनात विद्याधरबद्दल असूया होती. प्रत्येक वेळी आपला दुसरा क्रमांक! असे का होते? विद्याधर चांगल्या घरातला, त्याचे आई-बाबा उच्चशिक्षित, श्रीमंत म्हणूनच त्याचा पहिला क्रमांक येतो. असा विचार अजिंक्य सतत करायचा. त्याच्या मित्रांशी बोलताना विद्याधरबद्दल नको नको ते बोलायचा. विद्याधरला हे सर्व कळत होतं. शाळा सोडताना अजिंक्य सारखा आपला एक मित्र आपल्याबद्दल वाईट का बरे बोलतो? गेली दहा वर्षे आपल्या सोबत असणारा आपला हा मित्र असे का बरं वागतो? याचं कोडं त्याला उलगडत नव्हतं. आपण भाषण स्पर्धा जिंकण्यापेक्षा आपल्या मित्राचं मन जिंकलं पाहिजे असा विचार विद्याधरच्या मनामध्ये येऊ लागला. त्याचं मन आपण कसे जिंकू याचा विचार करता करता स्पर्धेचा दिवस उजाडला.

शाळेचे सभागृह गच्च भरले होते. व्यासपीठावर एक माईक उभा करू ठेवला होता. परीक्षक पहिल्या रांगे बसून परीक्षण करणार होते. विद्यार्थी शिक्षक यांची उत्सुकता शिगेल पोहोचली होती. सगळ्यांच्याच मना उत्सुकता होती, कोण जिंकणार? एक दोन, तीन, चार अशा क्रमांकाचे वक्त येऊन गेले. सगळ्यांची भाषणे छा होत होती. तेवढ्यात अजिंक्य राणेच नाव पुकारलं गेलं. टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. कारण अजिंक्यसुद्धा एक उत्तम वक्ता होता. तोही गेली चार वर्षे दुसऱ्या क्रमांकाचं बक्षीस मिळवतच होता. मोठ्या आवेशात, खणखणीत आवाजात, स्पष्ट शब्द उच्चारात, योग्य हातवारे आणि छान हावभावाचे प्रदर्शन घडवत अजिंक्यने सगळे सभागृह जिंकून घेतले. यावर्षी पहिलं बक्षीस अजिंक्यच मिळवणार याची खात्री सर्वांना पटली.

आता विद्याधर कुलकर्णींच्या नावाचा पुकारा झाला. एकदा, दोनदा, नव्हे तीनदा झाला. पण विद्याधर व्यासपीठावर आलाच नाही. सगळी मुलं, शिक्षकवृंद विद्याधरला शोधू लागले. पण विद्याधर तर कुठेच दिसेना. काय झाले? कुठे गेला? मुलांची कुजबूज सुरू झाली. पण दोन मिनिटांनंतर पुढचे नाव पुकारले गेले अन् स्पर्धा सुरू झाली. अजिंक्य मनातून खूप खूश झाला. आता पहिला क्रमांक आपलाच येणार याची त्याला खात्री पटली. पण विद्याधर स्पर्धा सोडून कुठे गेला? हा प्रश्न मात्र अजिंक्यला छळू लागला. यथावकाश स्पर्धा संपली. दहा हजार रुपयांचं पहिलं बक्षीस अजिंक्यलाच मिळालं. मोठ्या अभिमानानं त्यानं ते स्वीकारलं.

शाळा सुटण्याची बेल वाजली. अजिंक्य शाळेबाहेर पडला. तोच समोर विद्याधर उभा! अजिंक्यने मोठ्या उत्साहाने त्याला मिळालेलं पहिल्या क्रमांकाचं बक्षीस दाखवलं. विद्याधरने त्याला मिठी मारून त्याचं अभिनंदन केलं. मग अजिंक्यने त्याला विचारलं, अरे नेमका स्पर्धेच्याच वेळी तू कुठे गेला होतास? किती वेळा तुझे नाव पुकारले! विद्याधरला बघताच तिथे मुलांचा घोळका जमला. विद्याधर सांगू लागला, अरे अजिंक्य, स्पर्धा सुरू होण्यापूर्वी तुझा लहान भाऊ शाळेत आला होता. आईला बरं वाटत नाही असं तो रडत रडत सांगत होता. मग मीच त्याच्या सोबत गेलो आणि आईला जवळच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करून आलो. आता ती बरी आहे. हे ऐकताच अजिंक्य ओरडला, काय? माझ्या आईसाठी तू स्पर्धा सोडलीस! अजिंक्यचे डोळे भरून आले. त्याने विद्याधरला मिठी मारली आणि रडत रडत म्हणाला, विद्याधर किती मोठ्या मनाचा आहेस रे तू! मला पहिलं बक्षीस मिळावं म्हणून तू मला न सांगता स्वतः गेलास. हे खरं आहे ना? अजिंक्य भरल्या डोळ्यांनी विद्याधरकडे बघत होता अन् त्याच्या मनाचा मोठेपणा अनुभवत होता. दुसरीकडे विद्याधरला मात्र मित्राच्या रूपानं एक अमूल्य बक्षीस मिळालं होतं.

## हृदय निरोगी ठेवण्यासाठी आहारात करा या बियांचा समावेश, हृदयविकाराचा धोका राहील दूर !



आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत हृदयविकार हा एक सामान्य आणि चिंताजनक आजार बनला आहे. वयोगट कोणताही असो, हृदयविकाराचा झटका कोणालाही, कुठेही आणि कधीही येऊ शकतो. त्यामुळे या आजाराची लक्षणं ओळखणे जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच हृदय मजबूत ठेवण्यासाठी योग्य आहार घेणेही गरजेचे आहे. हृदयाचे आरोग्य टिकवण्यासाठी काही विशेष बियांचे सेवन उपयुक्त ठरते. या बिया शरीराला आवश्यक असलेले पोषणद्रव्य, फायबर्स, ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स, अँटीऑक्सिडन्ट्स आणि अन्य महत्वाची तत्त्वे पुरवतात, जे हृदयासाठी हितकारक असतात. चला जाणून घेऊया कोणत्या बिया हृदयविकार टाळण्यास मदत करू शकतात: १) भोपळ्याच्या बिया भोपळ्याच्या बियांमध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. हे पोषक तत्त्व रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करते आणि त्यामुळे स्ट्रोक किंवा हृदयविकाराचा धोका कमी होतो. २) सूर्यफूल बिया या बियांमध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम आणि प्रथिने भरपूर प्रमाणात असतात. हे पोषक घटक रक्तदाब कमी करण्यास, कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवण्यास आणि रक्तातील साखरेचा स्तर संतुलित ठेवण्यास मदत करतात. ३) चिया सिड्स चिया सिड्स हे फायबर आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड्सचा उत्तम स्रोत आहेत. हे बिया नियमित घेतल्याने शरीरातील खराब कोलेस्टेरॉल (ङऊङ) आणि ट्रायग्लिसराईड्सची पातळी कमी होते, त्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. ४) तीळ तीळ हे हृदयासाठी लाभदायक असून ते कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करतात. रोज एक चमचा तीळ सेवन केल्यास हृदयाचे आरोग्य सुधारते. ५) अळशीच्या बिया अळशीचे दाणे मॅग्नेशियमने भरलेले असतात आणि त्यात लिनोलिक ॲसिडसुद्धा आढळते. यामुळे कोलेस्टेरॉल पातळी १५% पर्यंत घटते आणि हृदयाचे ठोके नियमित राहतात. त्यामुळे कोरोनरी हृदयरोगाचा धोका कमी होतो. ६) मेथीचे दाणे मेथीमध्ये विरघळणारे फायबर्स आणि स्टेरॉइडल सॅपोनिन्स असतात, जे यकृतातील कोलेस्टेरॉलचे उत्पादन थांबवतात. त्यामुळे शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रणात राहते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते. हृदयाचे आरोग्य दीर्घकाळ टिकवायचे असेल तर या नैसर्गिक बियांना आपल्या दैनंदिन आहाराचा भाग बनवा. योग्य आहार, नियमित व्यायाम आणि तणावमुक्त जीवनशैली यामुळे हृदयविकारापासून मोठ्या प्रमाणात संरक्षण मिळू शकते.

## कडूलिंबामुळे स्कॅल्पच्या संसर्गापासून सुटका मिळते, कसे वापराल...

कडुलिंब कडू असू शकते, परंतु त्याचे फायदे खरोखरच प्रभावी आहेत. ते डोक्यातील कोंडा, खाज सुटणे, जळजळ किंवा टाळूच्या संसर्गासारख्या समस्यांवर नैसर्गिक उपाय म्हणून काम करते.

कडुलिंबाची चव कडू असू शकते, परंतु त्याचे फायदे खरोखर गोड आहेत. केस आणि टाळूच्या कोंडा, खाज सुटणे, जळजळ किंवा संसर्ग यासारख्या समस्यांवर ते रामबाण उपाय आहे. कडुलिंबाच्या पानांचे अँटीबॅक्टेरियल, अँटीफंगल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म टाळू स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यास मदत करतात, ज्यामुळे केस मजबूत आणि निरोगी होतात.



तेल संतुलित करते: तेलकट टाळू असलेल्यांसाठी, कडुलिंब नैसर्गिक टोनर म्हणून काम करते. टाळूच्या संसर्गास प्रतिबंध करते: बुरशीजन्य किंवा जिवाणूजन्य संसर्ग मुळापासून नष्ट करण्यास प्रभावी. कोंडा दूर करते: कडुलिंबाचा थंडावा आणि बुरशीनाशक गुणधर्म कोंडा आणि खाज कमी करतात. केस मजबूत करते: नियमित वापरामुळे केस गळणे कमी होते आणि मुळे मजबूत होतात. कडुलिंब वापरण्याचे सोपे घरगुती उपाय

**कडुलिंब आणि नारळ तेलाचा हेअर पॅक :** केसांसाठी कडुलिंब आणि खोबरेल तेल हे खूप प्रभावी घरगुती उपाय आहे. हा पॅक बनवण्यासाठी, ताज्या कडुलिंबाच्या पानांची पेस्ट बनवा आणि त्यात २ चमचे खोबरेल तेल घाला.

हे उपाय टाळूला खोलवर पोषण देते, कोंडा दूर करते आणि केस गळणे कमी करते.

**कडुलिंबाने केस धुणे :** कडुलिंबाचे पाणी केसांसाठी फायदेशीर आहे. ते तयार करण्यासाठी, १०-१२ कडुलिंबाची पाने घ्या, ती पाण्यात घाला आणि १० मिनिटे उकळवा. पाणी हलके हिरवे झाल्यावर ते थंड करा आणि गाळून घ्या.

**कसे वापरावे:** केस धुतल्यानंतर या पाण्याने तुमचे टाळू चांगले धुवा. आठवड्यातून दोनदा याचा वापर केल्याने डोक्यातील कोंडा आणि टाळूचे संक्रमण हळूहळू कमी होईल.

## तरुण दिसायचंय? आहारात 'या' फळांचा करा समावेश, त्वचा राहील चमकदार आणि निरोगी

आजच्या धावपळीच्या जीवनात चुकीची जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींमुळे अनेकांना अकाली वृद्धत्वाची लक्षणे दिसू लागतात. तुमच्या चेहऱ्यावर वाढत्या वयाची लक्षणे लवकर दिसू नयेत आणि त्वचा दीर्घकाळ चमकदार आणि तरुण राहावी, यासाठी आहारात योग्य फळांचा समावेश करणे महत्त्वाचे आहे. काही फळे अँटी-एजिंग गुणांनी समृद्ध असतात, जी त्वचेला पोषण देऊन सुरकुत्या आणि बारीक रेषा कमी करण्यास मदत करतात.



त्वचेला तरुण ठेवणारी अँटी-एजिंग फळे : तुमच्या आहारात खालील फळांचा नियमित समावेश केल्यास तुमची त्वचा हेल्दी आणि टवटवीत राहू शकते: संत्री संत्री व्हिटॅमिन सी कॅल्शियम आणि सिट्रिक सिडचा उत्तम स्रोत आहे. व्हिटॅमिन सी कोलेजन निर्मितीमध्ये मदत करते, ज्यामुळे त्वचा टाइट राहते. संत्री शरीरातील विषारी घटक बाहेर काढून त्वचेला आतून स्वच्छ ठेवते. डाळिंब डाळिंब अँटीऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन के चा चांगला स्रोत आहे. याचे नियमित सेवन केल्याने रक्त शुद्ध होते आणि त्वचेवर नैसर्गिक चमक येते. हे खराब झालेल्या त्वचेच्या पेशींची दुरुस्ती करून चेहऱ्याला गुलाबी चमक देते. पपई पपईमध्ये व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असतात. हे खराब झालेल्या आणि मृत त्वचेच्या पेशी काढून टाकून त्वचा स्वच्छ ठेवण्यास मदत करते. पपईच्या सेवनाने चेहऱ्यावरील डाग आणि पिग्मेंटेशन कमी होते. केळी केळ्यामध्ये असलेले व्हिटॅमिन आणि पोटॅशियम त्वचेचा रुक्षपणा कमी करतात आणि तिला आर्द्रता देतात. याच्या सेवनाने त्वचा हायड्रेटेड राहते आणि चेहऱ्यावरील सुरकुत्या दूर होतात. केळी त्वचेला नैसर्गिक चमक देण्याचेही काम करते. द्राक्षे द्राक्षे खाल्ल्याने त्वचेचे नुकसान आणि पिग्मेंटेशनपासून बचाव होतो. हे त्वचेचा टोन सुधारण्यास देखील मदत करते. द्राक्षांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि रेझवेराट्रोल त्वचा तरुण ठेवतात. व्होकॅडो व्होकॅडोमध्ये अनेक प्रकारचे मिनरल्स आणि ओमेगा-३ फॅटी सिड असतात. ओमेगा-३ फॅटी सिड चेहऱ्यावरील डाग आणि पिंपल्स दूर करण्याचे काम करतात. हे त्वचेला आतून दुरुस्त करते, ज्यामुळे त्वचा उजळ आणि स्वच्छ होते.

# तुम्ही मुलांना घाबरताय का?

नएजर्सच्यां मॅन्युप्युलेटिव्ह वागण्याने तुम्ही घाबरून गेला आहात का? मुलांवर तुमचं नियंत्रण राहायला हवं त्याऐवजी मुलं तुम्हाला कंट्रोल करताहेत का? मुलांच्या अशा वागण्याला 'चलाखीने वागणं' म्हटलं जातं. त्यांच्या अशा वागण्याने तुम्ही गोंधळून जाता, हताश होता. मुलांना अशावेळी कसा प्रतिसाद द्यावा हे तुम्हाला कळत नाही. मुलांच्या अशा वागण्यामागे काय हेतू असतो, तर पालकांना कंट्रोलमध्ये ठेवण्याची गरज या मुलांना वाटते, असं मानसशास्त्र सांगतं. या मुलांना त्यांच्या भोवतालच्या वातावरणावर प्रभाव पाडायचा असतो. पॉवरफूल व्हायचं असतं.

भावनिकदृष्ट्या जी मुलं पुरेशी प्रगल्भ नसतात. ज्यांच्यात जीवनाशी जुळवून घेण्याची कौशल्ये पुरेशा प्रमाणात नसतात. ती मुलं पालकांशी असं वागतात. या मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यात अडचणी येतात. अशावेळी ती हुशारीने तुमचं भावनिक शोषण करायला लागतात. जर अशी परिस्थिती तुमच्या मुलांबाबत निर्माण होत असेल तर ती परिस्थिती तपासून पाहा. तसेच मुलांच्या अशा विखारी वागण्यामागची कारणं जाणून घ्या.

अशी वागणारी मुलं कशी ओळखाल? १. ही मुलं तुम्हाला अपराधीपणाची भावना देण्यासाठी, भावनिकदृष्ट्या तुमचं शोषण करण्यासाठी, तुमच्या वागण्याने त्याला स्वतःला मी कसा 'विक्टिम' बनतोय हे दाखवण्यासाठी, मी कसा असहाय्य आहे, याची जाणीव देण्यासाठी अशा युक्त्या वापरत असतात. २. ज्या मुलांना आपल्या भावना व्यक्त करण्यात अडचणी येतात तेही हुशारीने पालकांना व इतरांना इमोशनल ब्लॅकमेल करू शकतात. ३. ही मुलं पालकांनी आखून दिलेल्या नियमांकडे दुर्लक्ष करतात. पालकांशी बोलणं बंद करतात. अपमानास्पद, स्वार्थीपणानं आणि मन दुखावलं जाईल असं वागतात. ४. ही मुलं पालकांशी ज्या पद्धतीनं वागतात त्याला 'गॅसलायटिंग' म्हणतात. ते खोटं बोलतात. कधीकधी अतिउत्साहीपणा दाखवतात. प्रामाणिकपणे वागतोय असं दाखवतात. ५. कधी कधी ही मुलं नाटकं करतात. त्यांचं वागणं स्फोटकही असू शकतं. आत्महत्येची भीती दाखवतात. आता थोडं या मॅन्युप्युलेटिव्ह वर्तनाचे बारकावे समजून घेऊ या. १. भावनिक शोषण यालाच



'इमोशनल ब्लॅकमेलिंग' असेही म्हणतात. हा टीनएजर्सच्या मॅन्युप्युलेटिव्ह वागण्याचा एक प्रकार आहे. यात टीनएजर्स अपराध, भीती, धमक्या यांचा वापर करतात आणि त्यांच्या मनासारखं करवून घेतात. तुम्ही मला हवे ते देत नाही अशा पद्धतीने तुमच्या मनात अपराधीपणाची भावना, भीतीची भावना निर्माण करतात. तुम्हाला दिलेली आश्वासनं ते पाळत नाहीत. त्यातून मग वादविवाद, राग, स्फोटक वर्तन असे प्रकार पालक आणि मुलं दोघांच्याही बाबतीत होतात. २. गॅसलाइटिंग गॅसलाइटिंग करताना मुलं वारंवार असं सांगून तुम्हाला खात्री देत असतात की, मी अशी गोष्ट परत कधीच करणार नाही. असं परत कधीच वागणार नाही. हेतू काय तर आता जे चुकीचं घडलंय ते पालकांनी पूर्णपणे विसरून जावं.मुलं त्या सत्याची अशी काही तोडमोड करतात की जणू ते बरोबर आणि तुमची बाजू चुकीची आहे असं वाटावं. 'मी जस्ट जोक केला'. 'तू फारच संवेदनशील आहेस' असं म्हणून तुम्हाला ते कमीतकमी दुखावत आहेत असंही दाखवतात. या प्रकारची मुलं राग राग करतात. बहुतेकदा लहानपणीचं वागणं टीनएजमध्येही कंटिन्यू राहतं. लहान वयातील 'टॅन्ट्रम्स' हे जास्त तीव्र असतात. जास्त व्यत्यय आणणारे असतात. कधीकधी तर ते किंचाळतात, वस्तू फेकतात, रडतात. असं करण्यामागे तुम्हाला अपराधीपणाची भावना देणे, हताश व्हायला लावणं हा प्रयत्न असतो. मग पालक नाईलाजाने मुलांना हवं ते देतात. त्यांच्या मनासारखं वागतात आणि एक दुष्टचक्र सुरू होतं. ही मुलं मग तुम्हाला त्रास देण्याचं कौशल्य वाढवत नेतात. त्यांच्या हातात कंट्रोल येऊन त्यांच्या मनाप्रमाणे व्हावं यासाठी ते असं करतात. पुढे यातूनच चिंता, निराशा असे मानसिक आरोग्याचे प्रश्न मुलांमध्ये तयार व्हायला लागतात. अशा प्रकारे वागणाऱ्या मुलांशी कसं डील करायचं ते आता समजावून घेऊ या. पालकांकरिता हे अत्यंत कठीण काम आहे. १. अति राग किंवा अति शांत राहणं टाळायला हवं. मॅन्युप्युलेटिव्ह वागणारी मुलं आईवडिलांच्या संयमाची अक्षरशः सत्त्वपरीक्षा पाहत असतात. सुरुवातीला अर्थातच तुम्ही मुलांवर ओरडता, त्यांच्या मागण्यांबाबत, अगदी शिक्षा देण्याबाबतही हात आखडता घेता किंवा त्यांच्या मागण्या पूर्ण करुन टाकाव्या असा मोहही तुम्हाला होतो. कारण मुलं दुःखी असली, डिप्रेस्ड दिसली की त्यांना 'नाही' म्हणणं सोपं नसतं. आपण मुलाला आनंदी ठेवण्यासाठी आपला अधिकार वापरतो पण हळूहळू परिस्थिती आणखी वाईट होते. म्हणून वेळीच मुलांचं हे वागणं ओळखा आणि ठाम राहा. २. मॅन्युप्युलेटिव्ह मुलांबरोबर तडजोडीचे धोरण कामाला येत नाही. मुलं त्यांना हवं त्या पद्धतीने तुमचे शब्द फिरवतात. कारण यात नेहमीच मुलांची बाजू वरची राहते आणि तेच परिस्थितीला कंट्रोल करतात म्हणून तुमच्या शब्दांना चिकटून राहा. ३. मुलांच्या वागण्याला रिक्ट होण्यापेक्षा रिस्पॉन्ड करा. जे मागितलं आहे त्याची खरंच गरज आहे का हे तपासून पाहा. त्यांच्या खोटं बोलण्यात, गोड बोलण्याच्या जाळ्यात अडकू नका. पडती बाजू नका घेऊ. ४. घरात वागण्याचे नियम ठरवा. ते न पाळल्यास त्याचे परिणाम काय होतील याची जाणीवही द्या. हे परिणाम मुलांना देताना खंबीर राहा. ते तुम्हाला इमोशनल ब्लॅकमेल करत असतील किंवा निगोशिएट करत असतील तर त्याला बळी पडू नका. दोन्ही पालकांनी याबाबत एकसारखे धोरण ठेवा. ठाम, खंबीर राहा. गरज वाटल्यास व्यावसायिक मदत जरूर घ्या. कारण मॅन्युप्युलेटिव्ह बीहेवियर असणाऱ्या मुलांशी वागणं ही खरोखरच सत्त्वपरीक्षा असते. असं असलं तरीही जर तुम्ही आखून दिलेल्या बाउंड्रीज ठरवलेले नियम यानुसार पती-पत्नी दोघेही मुलाशी ठामपणे राहिलात, वागलात तर मुलं तुमचा अधिकार घेऊ शकत नाहीत आणि तुम्ही मुलांना घाबरून राहण्याची गरजही उरत नाही.

# विशेष वृत्त

## संस्कार विद्यालयात महापुरुषांना अभिवादन

**बीड (प्रतिनिधी):-** येथील संस्कार विद्यालयात महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर माध्यमिक विभागाचे नवनियुक्त मु.अ.व्ही.डी. जोशी, प्राथमिक विभागाच्या मु.अ. शोभाताई कुलकर्णी, राजहंससर, खवले. व्ही. एम, वर्षा डोळस उपस्थित होत्या. या सर्व मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती, महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी विशेष वक्त्या वर्षा डोळस यांनी महात्मा गांधींच्या जीवन कार्यावर त्यांच्या विचारावर आपल्या भावना व्यक्त करून गांधीजींचा सत्याग्रहाचा मार्ग, अहिंसेचा मार्ग भारतीय स्वातंत्र्याला कसा उपयोगी ठरला हे सर्वांना पटवून दिले. तसेच खवले यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या बद्दल आपले विचार व्यक्त केले. प्रधानमंत्री असतानादेखील साधी राहणी उच्च विचारसरणी या शास्त्रींच्या विशेष गुणाबद्दल तसेच आपल्या कार्याबद्दल असणारा शास्त्रीजींचा प्रामाणिकपणा. या कार्यक्रमानंतर लगेचच नवनिर्वाचित मुख्याध्यापक व्ही. डी. जोशी, राजहंस यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी कार्यक्रमाचे संचलन डोईफोडे ए. आर यांनी केले तर प्रतीक्षा वाघ यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रम संपन्न झाला.

## मराठा सेवा संघाच्यावतीने जिवनावश्यक वस्तुंचे वाटप

**माजलगाव (प्रतिनिधी):-** अतिवृष्टी व महापुर अशा दुहेरी तडाख्यात सापडलेल्या माजलगाव तालुक्यातील सुरूमगाव येथे मराठा सेवा संघ जिल्हा बीड यांच्यावतीने जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्यात आला. मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे माजलगाव तालुक्यातील सुरूमगाव या गावचा जनसंपर्क तुटला होता. सध्या महापुराचे पाणी ओसरत आहे परंतु येथील नागरीकांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यासाठी मराठा सेवा संघ बीड यांनी 'पुरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा' या उपक्रमातुन जिवनावश्यक वस्तुंचे वाटप सुरूमगाव या ठिकाणी केले. यावेळी अशोकराव ठाकरे, धनंजय शेंडगे, राहुल वायकर, मधुकर शेळके, संतोष डोंगरे, किरण सावंत, मधुकर नवले, रामकृष्ण यादव, आनंदकुमार सिरसट यांसह गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## ग्रीन क्लबला शासनाचा व्दितीय पुरस्कार

**बीड (प्रतिनिधी):** येथील मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयातील बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थीनी मोमीन आलमीन हिस ग्रीन क्लब विभागाने पाणी बचती संदर्भाने केलेल्या उत्कृष्ट शॉर्ट व्हिडिओ-रीलला महाराष्ट्र शासनाचा द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, अप्पर मुख्य सचिव गोपाल रेड्डी, युनिसेफचे प्रमुख कबीर युसूफ, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुनील भिरुड, तंत्र शिक्षण विभाग सहसंचालक दत्तात्रेय जाधव, विभागीय सहसंचालक मगर आदी मान्यवरांच्या हस्ते पुणे येथे पारितोषिक वितरण संपन्न झाले.

## पिंपळनेरकरांनी लुटले दसऱ्याचे सोने

**पिंपळनेर (प्रतिनिधी):** उत्सव आला विजयाचा, दिवस सोने लुटण्याचा... नवे-जुने विसरून सारे, फक्त आनंद वाटण्याचा..' अशा शुभेच्छा एकमेकांना देत पिंपळनेरकरांनी अतिशय पारंपरिक पद्धतीने दसरा सण गुरुवारी उत्साहात साजरा केला. पहाटेपासून शहरात दसरा सणाचे वातावरण दिसून आले. घरोघरी वाहनांची, आपल्या दैनंदिन उपयोगातील साधनसामुग्रीची पूजा करण्यात आली. त्याचप्रमाणे आशापूरक गणेश मंदिरासह अन्य मंदिरांमध्ये नागरिकांनी देवाचे दर्शन घेतले. दसऱ्याच्या निमित्ताने नातेवाईक मित्रांना आपट्यांचा पाने देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. दसऱ्याच्या मुहूर्तावर फुल बाजारात झेंडू फुलांची मोठ्या प्रमाणात उलाढाल झाली. त्याचप्रमाणे अनेक भागात देखील विविध ठिकाणी झेंडू फुलांच्या विक्रीचे स्टॉल्स लागले होते. त्या ठिकाणी देखील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात झेंडूची फुलांसह, तोरणांची, आपट्यांच्या पानांची खरेदी केली. यंदा गुरुवारी दसरा आल्याने बुधवारी अनेक कार्यालयात दसरा साजरा करण्यात आला. त्यामुळे एक दिवस आधीच दसऱ्याची चाहूल लागली होती. दरम्यान गुरुवारी सकाळपासूनच मिठाईच्या दुकानात श्रीखंड, बासुंदी सह अन्य पदार्थ घेण्यासाठी नागरिकांची गर्दी झाल्याचे दिसून आले. दसऱ्याच्य स्वागतासाठी महिलांची पहाटेपासूनच लगबग सुरू होती. दारी रांगोळ्या काढल्या. विजयादशमीचा आनंद साजरा करण्यासाठी गृहिणींनी गोडधोडाच्या स्वयंपाकाचा बेत आखला होता. दुपारनंतर खऱ्या अर्थाने खरेदीचा माहोल दुकानामध्ये दिसून आला. टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, होम थिएटर आदी वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

## जय गजानन ग्रुपतर्फे पूरग्रस्तांना मदतीचा हात

**माजलगाव (प्रतिनिधी):-** पूरग्रस्तांच्या दुःखात सहभागी होत जय गजानन ग्रुपतर्फे तालुक्यातील खरात आडगाव व आडोळा येथील शाळेत आश्रय घेतलेल्या पूरग्रस्तांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. निता संदीप मुंदडा, संचालिका जय गजानन ग्रुप यांच्या मार्गदर्शनाखाली हा राबविण्यात आला. खरात आडगावजवळील गोदाकाठी असलेल्या शुक्ल तीर्थ, लिमगाव येथील २० कुटुंबांना आणि आडोळा येथील ३२ कुटुंबांना जीवनावश्यक किराणा साहित्याचे किट देण्यात आले. या किटमुळे पूरपरिस्थितीत अडकलेल्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला. यावेळी तलाठी आर.एम. गिनबुळे, राजाभाऊ आव्हाड, डॉ. संदीप मुंदडा आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच जय गजानन ग्रुपच्या महिला सदस्यांमध्ये संगिता कासट, वैशाली देशमुख, रोहीणी मालाणी, सुजाता इंदाणी, प्रतिभा मालाणी आणि रुपाली गिलडा यांची उपस्थिती होती.

## गेवराईत भागवत कथा, कीर्तन महोत्सव

**गेवराई (प्रतिनिधी):-** माजी राज्यमंत्री शिवाजीराव पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात ३ ते १० ऑक्टोबरदरम्यान भव्य श्रीमत भागवत कथा आणि कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवछत्रप्रेमींनी हा महोत्सव शिवनगरी, र.भ. अट्टल महाविद्यालय येथे आयोजित केला आहे. दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत समाधान महाराज शर्मा यांची भागवत कथा होईल. त्यानंतर सायंकाळी ६ ते ८ या वेळेत भजन संध्या आणि रात्री ८ ते १० या वेळेत महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारांची कीर्तनसेवा होणार आहे. भाविक भक्तांनी या धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक समितीने केले आहे.

# व्हायरल यादी अधिकृत नाही; प्रशासनाचे स्पष्टीकरण

## जिल्ह्यात अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीपिक नुकसानीचे संयुक्त पंचनामे सुरु

**बीड (प्रतिनिधी):** जिल्ह्यात सप्टेंबर २०२५ महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतीपिक नुकसानीचे संयुक्त पंचनामे तालुका स्तरावर सुरू आहेत. हे सर्व पंचनामे पूर्ण झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या वतीने शासनाकडे निधी मागणी तात्काळ करण्यात येणार आहेत. दरम्यान, समाजमाध्यमांवर अतिवृष्टीग्रस्त ३०४ गावांची यादी व्हायरल होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. परंतु ही यादी प्रशासनाने तयार केलेली नसून अधिकृत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे सीईओ शिवकुमार स्वामी यांनी स्पष्ट केले आहे.बीड जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात सततच्या मुसळधार पाऊस, अतिवृष्टी आणि ठिकठिकाणी नद्यांना आलेला पूर यामुळे खरीप हंगामातील शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. अनेक ठिकाणी घरात पाणी शिरले होते, शेत जमिन खरडून गेलेली आहे. या स्थितीची प्रशासनाकडून दखल घेतली जात असून त्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतीपिक नुकसानीचे संयुक्त पंचनामे तालुका स्तरावर सुरू आहेत. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या वतीने पुढील कार्यवाही करुन निधी मागणी केली जाणार आहे. असे असतानाच समाजमाध्यमांवर अतिवृष्टीग्रस्त ३०४ गावांची यादी व्हायरल होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. या यादीमुळे इतर गावांमध्ये नुक्सान झालेले नाही, असा चुकीचा संदेश प्रसारित होत असल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे. जिल्हा प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून त्यांच्या नुकसानीसंदर्भात तातडीने कार्यवाही केली जात आहे, असेही निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सांगितले.

**जिल्ह्यातील शेतकरी, नागरिकांनी व्हायरल यादीवर विश्वास ठेवू नये, अफवांवर अवलंबून राहू नये व केवळ अधिकृत माध्यमांतून मिळणारीच माहिती ग्राह्य धरावी. पंचनामे सुरू असून नुकसानीची संपूर्ण माहिती शासनाला योग्य मार्गाने सादर केली जाणार आहे.**
**– शिवकुमार स्वामी**
**निवासी उपजिल्हाधिकारी, बीड**

# मुलांना मोबाईलपासून दूर ठेवा, सुसंस्कृत पिढी घडवा-राहुल गिरी

## गेवराईत शारदा दुर्गा उत्सव समितीच्यावतीने विविध उपक्रमांनी नवरात्रोत्सव संपन्न

**गेवराई (प्रतिनिधी):-** आजचे जग डिजिटल युगाकडे वेगाने धावत आहे. मोबाईल हा मोठ्यांसाठी साचन आहे, पण लहान मुलांसाठी तो विनाशाचे शस्त्र ठरू शकतो. लहानग्यांना मोबाईलपासून दूर ठेवा आणि त्यांना संस्कारांची अमूल्य देणगी था, म्हणजेच सुसंस्कृत पिढी घडेल असे प्रतिपादन युवा विचारवंत व प्रेरणादायी वक्ते राहुलजी गिरी यांनी केले.

गेवराई शहरातील नगर परिषद कॉलनीत शारदा दुर्गा उत्सव समितीच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत वर्तमान पिढी वास्तव आणि अपेक्षा या विषयावर ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर व्यापारी महासंघाचे नेते सुरेंद्र आप्पा रुकर, सामाजिक कार्यकर्ते फुले काका, पत्रकार तथा सरपंच भागवत जाधव, लेखक व वक्ते धर्मराजजी करपे सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना त्यांनी आपल्या प्रभावी शैलीत उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना पालकांना विशेष संदेश दिला. ते म्हणाले की आजकाल पालक स्वतःच मोबाईलमध्ये गुरफटलेले आहेत. त्याचाच परिणाम लहान मुलांवर होत आहे. शिक्षण, खेळ, निसर्ग, माणुसकी, कुटुंबातील संवाद यापासून दूर होऊन लहानगे मोबाईलच्या आहारी जात आहेत. ही वेळ पालकांनी गांभीर्याने घेण्याची आहे. आपल्या मुलांना संस्कारांचे, मूल्यांचे आणि आदर्शाचे शिक्षण द्या. मोबाईलचे व्यसन नको तर सुसंस्कृत जीवन हवे असे सांगितले. दरम्यान त्यांनी महिलांना विशेषतः उद्देशून आवाहन केले की आईच मुलांची पहिली गुरू आहे. आईने जर मुलांना योग्य

संस्कार दिले तर ती पिढी कधीच भरकटत नाही. त्यामुळे सुसंस्कृत समाज निर्मितीत माता भगिनींचा वाटा सर्वांत मोठा आहे. या प्रसंगी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्यासह अनेक महापुरुषांच्या विचारांचे दाखले देत तरुणाई व नागरिकांना प्रेरणादायी स्संदेश दिला. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी माऊली गंगाधर, संजूभाऊ भालशंकर, दिनेशजी

भंडारी, संतोषजी कोटेकर, डॉ. घोलप, विनय सरपते, नितीन शेटे, सोनू साबळे, गिरी काका, श्रीकांत भंडारी आदींनी परिश्रम घेतले. यावेळी कॉलनीसह परिसरातील नागरिक, लहान मुले, युवक, माता-भगिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक संतोषजी कोठेकर सर यांनी केले. तर शेवटी संजयजी भालशंकर यांनी सर्वांचे आभार

## लिंबागणेश ते बोरखेड रस्ता पुन्हा सुरू

**बीड (प्रतिनिधी):** तालुक्यातील लिंबागणेश ते बोरखेड रस्ता गेल्या काही आठवड्यांपासून अतिवृष्टी आणि पुरामुळे वाहून गेला होता. या रस्त्यामुळे गावकऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम झाला होता. शाळा, सरकारी कार्यालये, बाजारपेठ आणि वैद्यकीय सुविधा पोहोचणे कठीण झाले होते, तर शेतकरी त्यांच्या शेतीसाठी लागणारी साधने आणि उत्पन्न बाजारात नेणे या अडचणींना सामोरे जात होते. बीड प्रवासासोबतच रोजच्या कामकाजावरही मोठा परिणाम झाला होता. 'अतिवृष्टी आणि पुरानंतर रस्ता पूर्णपणे वाहून गेला होता. शाळेत जाणारे मुलं आणि कामावर जाणारे नागरिक मोठ्या अडचणीत होते. स्थानिक कार्यकर्ते विक्की वाणी यांचा व ग्रामस्थांच्या सततच्या केलेल्या पाठपुराव्या मुळे आ. संदीप क्षीरसागर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी प्रशासनास त्वरित पत्रव्यवहार केला. प्रशासनाने रस्त्याचा नुकसानामुळे तातडीने उपाययोजना केली.

## दांडिया सारख्या उपक्रमातून कलागुणांना वाव : सरदेसाई

**पाटोदा (प्रतिनिधी)** दुर्गेची आराधना करताना कलागुणांना वाव देण्यासाठी दांडिया सारखे उपक्रम उत्कृष्ट आहेत. आता पाटोदा सारख्या ग्रामीण भागातही दांडियाचे आयोजन होत असल्याच्या आनंद आहे. असे प्रतिपादन अभिनेता सत्यम सरदेसाई यांनी केले.


पाटोदा येथे रेणुकाई प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या दांडिया महोत्सव २५ च्या बक्षिस वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी वाहिन्यांचे 'अवॉर्ड शो कोरिओग्राफर' यश चव्हाण उपस्थित होते. गतवर्षापासन पाटोद्यात दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. दामिनी पारगावकर, पूनम पंडित, सुरेखा गुंड, रुपाली शेवाळे, वर्षा मोरे, शिल्पा बेदरे यांच्या पुढाकारातून हा महोत्सव सुरू करण्यात आला आहे.विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या पोलीस, डॉक्टर, शिक्षक, गृहिणी यांचा सन्मान या महोत्सवात केला जातो. दांडिया स्पर्धेत तीन गटात श्रेया कोळपकर, श्रद्धा काळुसे, कोमल पवार, कांचन गोरे, ऐश्वर्या पोते, जानवी खरमाटे, गौरी रंधवे, ओवी कोळपकर यांनी बक्षीस पटकावली सरदेसाई आणि चव्हाण यांच्या हस्ते त्यांना बक्षीस देण्यात आली.

# जिल्ह्यातील तीन हजार ७९६ ग्राहकांच्या घरात 'सूर्य' प्रकाश!

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेत विजेबाबत स्वयंपुर्ण व्हा; महावितरणचे आवाहन

**बीड (प्रतिनिधी):-** जिल्ह्यातील अनेक बीजग्राहक छतावरील सौरऊर्जाकडे वळू लागले असून, ते स्वतःच स्वतःची वीज तयार करत आहेत. प्रधानमंत्री मोफत सूर्यधर योजना सर्वसामान्य नागरिकांसाठी फलदायी ठरू लागली आहे. सूर्यधर योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील तब्बल ३ हजार ७९६ घरगुती वर्गवारीतील ग्राहक विजेबाबत स्वयंपूर्ण झाले आहेत.

महावितरणकडून बीड जिल्ह्यात प्रधानमंत्री सुर्यघर योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील तब्बल ३ हजार ७९६ ग्राहकांनी घराच्या छतावर सौरऊर्जेचे संच बसवले आहे. यामध्ये आंचाजोगाई विभागातील १७९० वीज्याहकांनी ६.५७ मेगाबॅट क्षमतेचे तर बीह विभागातील २००६ ग्राहकांनी ६.५७ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जेचे संच बसवले आहेत. ४ हजार ग्राहकांच्या छतावर सौर संच बसविण्याचे काम सुरू असून, लवकरच हे काम पूर्णत्वास येणार आहे. प्रधानमंत्री सूर्वघर मोफत चीज योजनेत घराच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प बसवून वीजनिर्मिती केली जाते. घरगुती ग्राहकांच्या मदतीसाठी केंद्र शासनाने गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात ही योजना सुरू केली होती. त्यासाठी केंद्र सरकारकडून एक किलोवॅट क्षमतेच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी तीस हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेसाठी साठ हजार रुपये तर




तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेसाठी ७८ हजार रुपये थेट अनुदान मिळते. या योजनेतील ग्राहकांना मोफत नेट मीटर देण्याचाही निर्णय महावितरणने घेतला आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना https://pmsuryaghar. gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. छतावरच्या सौरऊर्जा प्रकल्पात घराच्या गरजेपेक्षा अधिक बीज निर्माण झाल्याने वीजबिल शून्य होते.

# अनुदानित शिक्षकांची दिवाळी गोड करा

## मराठवाडा शिक्षक संघाचे शिक्षण संचालक यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**बीड (प्रतिनिधी):-** आझाद मैदानावरील शिक्षकांचे आंदोलन आणि दोन दिवशीय शाळाबंद आंदोलनामुळे टप्पावाढ घोषित करण्यात आली, टप्पावाढीचे आदेश देण्यात येत आहेत. परंतु टप्पावाढीचे कोरडे आदेश काय कामाचे असा संतप्त सवाल करून तात्काळ आर्थिक तरतूद करून अंशतः अनुदानित शिक्षकांची दिवाळी गोड करावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम व जिल्हा सचिव गणेश आजये यांनी शिक्षण संचालक पुणे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हा सचिव गणेश आजये यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, कायम शब्द काढलेल्या सुमारे साडेचार हजार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासनादेशानुसार पुढील टप्पावाढ देण्यात यावा म्हणून आझाद मैदानावर आंदोलन करण्यात आले. त्यास पाठींबा माणून ०८ व ०९ जुलै २०२५ असे दोन दिवस राज्यात दोन दिवशीय शाळाबंद आंदोलन करण्यात झाले. २००१ पासून वेतनासाठी झगडणाऱ्या शिक्षकांनी आझाद मैदान ओव्हरफ्लो झाले, आंदोलनाची तीव्रता आणि खदखद पाहून सरकारने स्वतःच वर्षभरापूर्वी काढलेल्या शासनादेशाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला, टप्पावाढीसाठी ९७० कोटी रुपयांची तरतूद केल्याची घोषणा केली. त्यानंतर जवळपास तीन महिन्यांनी टप्पावाढीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत परंतु त्यासाठी आवश्यक तो निधी देण्यात आलेला नाही. त्यामुळे कोरडे आदेश काय कामाचे? असा जळजळीत सवाल विचारला जात आहे. आता दिवाळीचा सण तोंडावर आहे. टप्पावाढीसाठी ताबडतोय निधी वितरित करून वाढीव पगार दिवाळीपूर्वी शिक्षकांच्या खात्यावर जमा करावा, पुनश्च काळी दिवाळी साजरी करण्याची वेळ शिक्षकांवर येवू देवू नये अशी विनंती मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे व जिल्हा सचिव गणेश आजवे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# करूणा, मैत्रीच्या मार्गानेच मानवतेचा उध्दार : डॉ. खेमधम्मो महाथेरो

**बीड (प्रतिनिधी):-** जगाला प्रज्ञा, शील, करुणा-मैत्रीची शिकवण देणारा, मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे सम्यक संबुद्ध गौतम बुद्ध होय. त्यांनी दिलेला धम्म म्हणजे केवळ एका धम्मपथाचा उपदेश नसून, मानवी जीवनाला दिशा देणारा शाश्वत मार्ग आहे. असे विचार भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो यांनी व्यक्त केले.

बीड तालुक्यातील महाविहार धम्मभूमी डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर, शिवणी ता. जि. बीड येथे गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्मपरिषद पार पडली. सदरील धम्मपरिषद प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेकडून आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उदघाटक भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो बोलत होते. या धम्मपरिषदेला संस्थेचे सचिव तथा धम्मपरिषदेचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशील थेरो, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भदंत डॉ. इंदवंस्स महाथेरो, प्रमुख मार्गदर्शक भिक्खु उपगुप्त महाथेरो, प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, एसपी नवनीत कॉवत, समाज कल्याण आयुक्त प्रदिप भोगले, समाज कल्याण आयुक्त रविंद्र शिंदे, समाज कल्याण सहसंचालक डी. बी. क्षीरसागर, उपायुक्त उमेश सोनवणे, शास्त्रज्ञ डॉ. सिध्दार्थ जोंधळे, प्रमुख धम्मदेसना भिक्खु पय्यातीस महाथेरो, भिक्खु महाविरो थेरो, भिक्खु नागसेन, भिक्खु धम्मघोष, भिक्खु चंद्रमुनी, भिक्खु धम्मप्रिय, भिक्खु पय्यावर्धन, भन्ते बुद्धबोधी आदींची उपस्थिती होती. पुढे धम्मदेसना देताना भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो म्हणाले की, गौतम बुद्धांच्या शिकवणीमुळे समाजातील अंधश्रद्धा, भेदभाव आणि असमानता यांना जबर धक्का बसला. म्हणूनच विज्ञानावर आधारलेला बौद्ध धम्म आज जागतिक पातळीवर स्वीकारला जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे आपल्याला बौद्ध धम्माची दीक्षा देवून उद्धार केला आहे. त्या धम्म प्रवर्तन दिनाला आज ६९ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच भिक्खु धम्मशील थेरो यांच्या संयोजनातून ही धम्मपरिषद होत असून ही बाब गौरवास्पद आहे. त्यामुळे बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार अधिक गतीने होण्यास मदत होत आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले.

# तुलसी समूहाच्या विद्यार्थ्यांची रंगभूमीवर बाजी

## एकांकिकासह अभिनय क्षेत्रात प्रथम क्रमांक

**बीड (प्रतिनिधी):-** दोन वेगवेगळ्या विद्यापीठांत झालेल्या युवा महोत्सवांत बीडच्या तुलसी शैक्षणिक समूहाने आपल्या कामगिरीची सुवर्ण अक्षरांनी नोंद करून दुहेरी मानाचा तुरा मिळवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे २७ ते २९ सप्टेंबरदरम्यान भरलेल्या केंद्रीय युवा महोत्सवात तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय या महाविद्यालयाचा विद्यार्थी आदित्य ठोंबरे याने एकांकिका स्पर्धेतील बेस्ट ॲक्टरचा मान पटकावला.

दरम्यान, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ आयोजित उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक युवा महोत्सवात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या विद्यार्थिनी आरती औटे व इतर सहकाऱ्यांनी सादर केलेल्या पाझर या एकांकिकेला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. या दुहेरी यशाबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभशनिवारी महाविद्यालयात आयोजित करण्यात आला. यावेळी तुलसी समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रेरणादायी पुस्तके, पेन व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना प्रा. प्रदीप रोडे यांनी सांगितले की, ठाम निर्णय, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि आत्मविश्वास या जोरावर प्रत्येक ध्येय गाठता येते. पराभवाची मानसिकता बाजूला ठेवून सकारात्मक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक आहे. अकॅडमिक प्रगतीसोबतच कौशल्यांचा विकासही तितकाच महत्त्वाचा आहे. वेळ कधीच परत येत नाही, त्यामुळे विद्यार्थिदशेत वाचनाची सवय लावून घेतली तर आयुष्य समृद्ध होईल असे नमूद केले. इतर मान्यवरांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशाचे कौतुक केले. यावेळी कार्यक्रमाला डॉ. सुनील जोंधळे, प्रा. अर्जुन राठोड, प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, प्राचार्य डॉ. अश्विनी बेद्रे, प्राचार्य प्रा.प्रकाश ढोकणे, प्राचार्य डी.डी. राऊत यांचेसह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.डी.जी.निकाळजे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शिल्पा बोराडे यांनी मानले.

# कपिलधारवाडी येथील भयभीत ग्रामस्थांच्या प्रश्नी माजी मंत्री क्षीरसागर यांची राज्याच्या सचिवांशी चर्चा



बीड (सरकार): तालुक्यातील कपिलधारवाडी येथे मागील काही दिवसांपासून घरांना तडे पडणे आणि रस्त्याला मोठमोठ्या भेगा पडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावकर्यांनी सुरक्षिततेसाठी तीर्थक्षेत्रात स्थलांतर केले आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तात्पुरती स्थलांतराची व्यवस्था आणि नुकसान भरपाईसाठी मागणी केली आहे.

ग्रामस्थांनी शुक्रवारी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेऊन कपिलधारवाडीची माळीण होते की काय? अशी भिती व्यक्त केली. यावेळी माजी मंत्री क्षीरसागर यांनी तातडीने राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांना संपर्क साधून याबाबत तातडीने कारवाई करून ग्रामस्थांना मदत करणे गरजेचे असल्याचे सांगितले. सचिव राजेश कुमार यांनी तातडीने प्रशासनाला देखील सूचना केल्या आहेत. यावेळी युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, दिनकर कदम, विलास बडगे, गणपत डोईफोडे, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, चंद्रसेन नवले, गणेश नवले आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



मांजरसूंबा घाटाच्या पायथ्याला असलेल्या कपिलधारवाडी येथील ग्रामस्थ शुक्रवार दि.३ रोजी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे आले होते. त्यांनी सांगितले की, कपिलधारवाडी गावकर्यांनी रात्रीच स्थलांतर केले. मात्र उरलेल्या लोकांसाठी प्रशासनाने तातडीने मदत करावी असे ग्रामस्थांनी सांगितले. रस्त्याला पडलेल्या भेगा व घरांवरील तडे यामुळे ग्रामस्थांत भीतीचे वातावरण पसरले आहे. अतिवृष्टीमुळे दरड कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गावाचे पुनर्वसन तातडीने करण्यात यावे यासाठी राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांच्याकडे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी मागणी केली असून या गावातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी जिल्हा प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत. कपिलधारवाडी ता. बीड हे गाव डोंगरावर वसलेले असून अतिवृष्टीमुळे डोंगरात मोठ्या प्रमाणात पाणी मुरले आहे. गावातील घरांना मोठ्या भेगा पडल्या असून भूस्खलन होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माळीणची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून जिल्हा प्रशासनाने त्वरित दखल घ्यावी आशा सूचना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दिल्या आहेत. यामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## कपिलधारवाडीच्या ग्रामस्थांचे जीव धोक्यात;तातडीने पुनर्वसन करा-आ.संदीप क्षीरसागर

### मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,मदत व पुनर्वसन मंत्री,आपत्ती विभाग मंत्र्यांना दिले पत्र

बीड (सरकार): मागील काही काळात सततच्या मुसळधार पावसामुळे व अतिवृष्टीमुळे कपिलधारवाडी येथे भूस्खलन झाले आहे. यामुळे गावकऱ्यांचा जीव धोक्यात असून त्यांचे तात्काळ पुनर्वसन करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

मौजे पाली ग्रामपंचायत अंतर्गत कपिलधारवाडी छोटेसे ९० कुटुंबाचे गाव वास्तव्यास आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे वातीवृष्टीमुळे सदरील गाव अतिशय गंभीर संकटात सापडले आहे. या ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे गावांमध्ये भूस्खलन सुरू झाले असून जमिनीत, डोंगराच्या कडेला, रस्त्यावर, शाळा खोली, घरे, मंदिरे, संरक्षण भिंत व इतर ठिकाणी मोठ्या भेगा व तडे गेले असून त्यात सातत्याने वाढ होत आहे. ग्रामस्थांना घरी जाणे धोकादायक झाल्याने ग्रामस्थांना, आबालवृद्धांना,महिला भगिनींना, शाळकरी विद्यार्थ्यांना, दिवस व रात्र आजच्या घडीला श्री. मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधार या ठिकाणी वास्तव्य करावी लागत आहे. त्यामुळे ग्रामस्थांना कायमस्वरूपी दिलासा देणे व तातडीने पुनर्वसन होणे आवश्यक आहे. यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. जसे की, १) कपिलधारवाडी गाव तातडीने धोकाग्रस्त क्षेत्र घोषित करावे २) प्रभावित सर्व कुटुंबाचे तातडीने स्थलांतर व पुनर्वसन व्यवस्था करावी ३) कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी नवीन जागा व निवासी योजना जाहीर करून तात्काळ अंमलबजावणी व्हावी ४) शाळा व सार्वजनिक इमारतीची सुरक्षा तपासून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था करावी ५) या सर्व कामांसाठी आपत्ती निवारण निधी नरेगा व पुनर्वसन विभागाचा निधी तथा इतर योजनेमधून निधी मंजूर करून ग्रामस्थांना यथोचित सहकार्य व्हावे अशा विविध मागण्यांचे पत्र आ. संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार, मदत व पुनर्वसन विभागाचे मंत्री मा.ना.मकरंद जाधव पाटील, आपत्ती विभाग मंत्री मा.ना.गिरीश महाजन यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर, जिल्हाधिकारी, बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हा आपत्ती व व्यवस्थापन, बीड, उपविभागीय अधिकारी बीड, तहसीलदार बीड, गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांना पत्रव्यवहाराद्वारे केली आहे.



बीड विधानसभा मतदारसंघातील ग्रामपंचायत मौजे पाली अंतर्गत असलेले कपिलधारवाडी हे अंदाजे ९० कुटुंबांचे रहिवाशी गाव वसलेले आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने व यापूर्वी देखील संरक्षण भिंत,रस्ता व इतर व्यवस्थेला धोका निर्माण झाल्याने सन २०२२-२३ ते आजतागायत याविषयी आ. संदीप क्षीरसागर यांनी सातत्याने यथोचित पत्र व्यवहार व उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करत आहेत. त्यातच ३० सप्टेंबर २०२५ रोजी रात्री उशिरा रस्ता,शाळा खोली, डोंगराचा काही भाग, घरांना मोठ्या प्रमाणात तडे जाण्याचे काम झाले आहे. त्या तळ्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. अशावेळी ग्रामस्थांना शासन व प्रशासन यांच्याकडून सर्वरित्या सहकार्य होणे गरजेचे असून याबाबत उचित कार्यवाही सुरू आहे. सर्व कुटुंबाची तात्पुरती व्यवस्था श्री. मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधार येथे होणे आवश्यक आहे. प्रशासनाने पंच कमिटी श्री. कपिलधार यांना याबाबतीत अवगत करावे. जेणेकरून पंच कमिटी कडून गावकऱ्यांना याबाबतीत यथोचित सहकार्य होईल व त्याचबरोबर ग्रामस्थांच्या हाताला काम, विद्यार्थ्यांना शाळा व भोजन व्यवस्था होईल. याबाबत प्रशासनाकडून आदेश काढण्यात यावेत.

## बौद्ध धम्म रॅलीत जास्तीत जास्त बौद्ध बांधवांनी सहभागी व्हावे-संयोजन समिती

परळी (सरकार): आजच्या बौद्ध धम्म रॅलीत जास्तीत जास्त बौद्ध बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजन समिती यांनी केले आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील सुगंध कुटी बुद्ध विहार येथे आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीमध्ये किल्लारी येथील पूज्य भंते धम्मसार थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षावास अधिष्ठान चालू होता या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये भीम नगर येथील ९० उपासकांनी रोज भंते धम्मसार थेरो यांचं भोजनदान व सायंकाळी सामूहिक खीरदान करण्याचं काम येथील या ९० उपासकाने केला असून त्याचा समारोप आज दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी भव्य अशा धम्म रॅलीने होणार असून या धम्म रॅली ची सुरुवात सकाळी ठीक दहा वाजता बसवकल्याण येथील पूज्य भंते धम्मनाग महाथेरो यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून होणार असून लगेच भंते व श्मनेर संघास भोजनदान देण्यात येणार असून यानंतर धम्मदेशना व भंते धम्मसार थेरो यांना एक चार चाकी वाहन दान देण्यात येणार आहे तसेच अकरा वाजता धम्मा रॅली सुरुवात होऊन त्यानंतर सामूहिक भोजनदान होणार आहे या रॅलीत उंट घोडे पारंपारिक वाद्य अशी भव्य ऐतिहासिक धम्म रॅली निघणार असून या धम्म रॅलीत परळी परिसर व शहरातील सर्व श्रद्धावान बुद्ध उपासक-उपासिकांनी पांढरे वस्त्र परिधान करून या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन संयोजन समिती यांनी केले आहे.

## आगामी निवडणुकांत काँग्रेस पुर्ण ताकतीने उतरणार-अहमद चाऊस

### परळीत काँग्रेसच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांचा निर्धार

परळी (सरकार)आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पुर्ण ताकदीने उतरणार असुन सर्वच गट व गणांमध्ये सक्षम उमेदवार उतरवणार आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या पाठिशी काँग्रेस आपली ताकद लावणार असल्याचे काँग्रेसचे परळी विधानसभा प्रभारी अहमद चाऊस यांनी सांगितले.



परळी शहर व तालुका काँग्रेसची आढावा बैठक पार पडली. परळी विधानसभा प्रभारी अहमद चाऊस औरंगाबाद छत्रपती संभाजी नगर यांच्या उपस्थितीत दि.३ ऑक्टोबर रोजी परळी येथील नवीन शासकीय विश्राम गृह शिवाजी चौक येथे दुपारी ३ वाजता पार पडली.या बैठकीत अंबाजोगाई शहर काँग्रेस अध्यक्ष,त्यांचे सहकारी सय्यद अतिक भाई,परळी तालुका अध्यक्ष प्रकाश मुंडे,परळी शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई, ओबिसी महाराष्ट्र उपाध्यक्ष वसंत मुंडे,महाराष्ट्र प्रदेश माजी सरचिटणीस अनिल मुंडे,माजी शहर अध्यक्ष प्रकाश देशमुख आदी पदाधिकार्यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत अनेक कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले.चाऊस यांनी आगामी सर्व निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी तयारी करावी काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीनिशी पाठीशी उमेदवारांच्या पाठिशी उभा राहणार असल्याचे सांगितले.

## नवगण महाविद्यालयात स्व.केशरकाकुंना अभिवादन

परळी वैजनाथ (सरकार): माजी खासदार स्वर्गीय केशरकाकू क्षीरसागर यांच्या पुण्यतिथी निमित्त नवगण महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे यांच्या मार्गदर्शनानुसार घेण्यात आला यावेळी विविध विभाग प्रमुख, प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वर्गीय क्षीरसागर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. मचाले यांनी आपल्या मनोगतात स्व. केशरकाकू क्षीरसागर यांचे सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक कार्याचे स्मरण करून विद्यार्थ्यांना प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. यावेळी प्राध्यापकांनीही त्यांच्या कार्याचा गौरव करत आठवणींना उजाळा दिला.

या अभिवादन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भागवत फुलारी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा सुभाष लांडगे यांनी मानले. उपस्थितांनी शांततेत दोन मिनिटे मौन बाळगून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## सात दिवसात मोक्ष प्राप्त करुन देणारा भागवत ग्रंथ आहे-भागवताचार्य समाधान शर्मा

गेवराई (सरकार): शिवछत्र परिवाराने पावसात अडकलेल्या लोकांना, शेतकऱ्यांना मदत केली ही रिल नाही तर रियल काम असून शिवछत्र परिवाराकडून गेल्या चार वर्षांपासून गेवराई तालुक्यातील जनतेला आनंद देण्यासाठी शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आनंद आणि वैभवाचे सोहळे आयोजित केले जात आहेत असे गौरवोद्गार काढून सात दिवसात आपल्याला मोक्ष प्राप्त करुन देणारा ग्रंथ भागवत ग्रंथ आहे असे प्रतिपादन भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी केले.



माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या भागवत कथा आणि किर्तन महोत्सवाला आज थाटामाटात प्रारंभ झाला. प्रारंभी शारदा विद्यामंदिराच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या मिरवणूकीतून भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांचे शिवनगरीत आगमन झाले. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या वतीने समाधान शर्मा यांचे स्वागत केले. याप्रसंगी दत्त संस्थान शिंपेगावचे महंत ह.भ.प. हनुमान महाराज, ह.भ.प. बप्पा महाराज राऊत, माऊली संस्थान बोरी पिंपळगाचे ह.भ. प. नामदेव महाराज यांच्या हस्ते कलश, भागवत ग्रंथ आणि भगवान श्रीकृष्ण यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

यावेळी समाधान शर्मा यांनी आपल्या अमोघ वाणीतून कथा प्रस्तुत करुन उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव पंडित, शिव शारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## सेवानिवृत्त प्राचार्य नवीद सिद्दीकी यांचा सेवापूर्ती गौरव सन्मान

बीड (सरकार): शहरातील नामवंत मिल्लिया महाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहामध्ये सेवानिवृत्त प्राचार्य नवीद सिद्दीकी यांचा सेवापूर्ती गौरव सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



ऊक़ाब रिलीफ फाउंडेशन, बीड यांच्या वतीने सीरतुन्नबी प्रश्नोत्तरी स्पर्धा व पारितोषिक वितरण समारंभ दिनांक २ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:३० वा. मिल्लिया महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात उत्साहात पार पडला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी मुहम्मद अली बागे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अ‍ॅड. सय्यद फ़ैज़ उपस्थित होते.

या कार्यक्रमात शंभराहून अधिक विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. समारंभात नवीद सिद्दीकी (सेवानिवृत्त प्राचार्य, नॅशनल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बीड) यांचा सन्मान सोहळा करण्यात आला. त्यांना सपत्नीक शाल, मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. मुहम्मद इलयास, एहसान सौदागर, फ़ैज़ान अली बागे, इंजि. सुफ़ियान,मोमीन आमेर, शेख ऐहतशाम, शेख शाजेन, मुहम्मद फारेस, अब्दुल सबुर, हारेस अन्सारी,मुश्ताक भाई यांच्यासह अन्य सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतले.

## न.प मुख्याधिकाऱ्यांसोबत सोबत बीड शहर बचाव मंचाची पुन:स्मरण बैठक

### धानोरा रोड सोबतच अंकुश नगर रस्त्याचे काम चालू करा;शहरातील अनेक महत्त्वाच्या कामांविषयी एक तास सकारात्मक चर्चा

बीड (सरकार): बीड नगरपरिषदेचे सकारात्मक पद्धतीने कार्यरत झालेले मुख्याधिकारी मा. शैलेश फडसे यांच्यासोबत बीड शहरातील अतिशय तातडीच्या समस्यां व मागण्यां विषयी बीड शहर बचाव मंचाच्या शिष्टमंडळाची सविस्तर सकारात्मकपणे एक तास चर्चा झाली.

नगरपरिषद सी.ओ शहरातील समस्यांविषयी संवेदनशील पणे काम करत आहेत असे दिसून येत आहे. परंतु राजकीय पुढारी व त्यांचे काही जवळचे कार्यकर्ते त्यांच्या कामामध्ये अडचणी निर्माण करत आहेत अशी त्यांनी खंत यावेळी बोलून दाखवली. तरी यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या सर्व शिष्टमंडळाच्या वतीने आम्ही तुमच्या सकारात्मक पद्धतीने चाललेल्या कामांमध्ये पूर्ण सहयोग करत राहू असे सांगितले. यावेळी मुख्याधिकारी यांनी, कॉल केलेले काही टेंडर्स राजकीय पुढाऱ्यांच्या कार्यकर्त्यांनींच भरून, काही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण करून टेंडर्स रिकॉल करण्यासाठी भाग पाडत आहेत आणि जाणीवपूर्वक वेळ वाया घालवून, मुद्दाम कामे प्रलंबित ठेवण्याचे काम करत आहेत असे सांगितले. यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने एक महिन्यापूर्वी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने बीड शहरातील चाललेल्या कामांचा व व इतर समस्यांचा पुनःस्मरण करून सविस्तर चर्चा करून आढावा घेण्यात आला. यावेळी केलेल्या निवेदनामध्ये ;



१. धानोरा रोड साठी निधी उपलब्ध झाला आहे, त्याप्रमाणे दर्जेदार काम व्हावे, ही अपेक्षा आहे. २. अंकुशनगर रस्त्यांसाठी देखिल प्राधान्यक्रमाने निधी मिळविण्याची कार्यवाही व्हावी. तद्वतच शहरातील १८ पेक्षा जास्त रस्त्यांची आम्ही दिलेल्या यादीप्रमाणे सत्त्वर कार्य व्हावे, निधी मिळवावा. ३. रस्त्यावरील पथदिवे लावून होण्याचे पुनःस्मरण करीत आहोत, ४. अतिवृष्टी व भयंकर पुरामुळे शहरातील नाल्या- तुंबलेल्या आहेत – त्यांची सफाई करावी. अगदी कॉलनींच्या कोपऱ्या-कोपऱ्यांवर कचऱ्यांचे घाणेरडे ढीग लागलेलेआहेत, ते उचलावेत. कॉलन्यांमधील मधील नाल्यांची सफाई, दुरुस्ती आरोग्याच्या दृष्टीकोनातून तातडीने सुरु करण्यात यावी. ५. घंटागाडी प्रत्येक कॉलनीत नियमीतपणे जाईल,अशी तातडीने उपाययोजना करून हमी निर्माण व्हावी. ६. मोकाट कुत्रे व जनावरांचा बंदोबस्त अद्याप झालेला नाही; याबाबत आपण दिलेल्या आश्वासनाचे काय झाले ? ७. अंकुशनगर रस्त्यावरील 'मुख्य पाणी पुरवठा पाईप लाईन' बदलण्यासाठीचे 'बजेट' उपलब्ध असताना तेकाम प्रलंबित ठेवले आहे; ते लाईन बदलण्याचे काम विनाविलंब व्हावे. ८. निधीअभावी रस्त्यांचे काम करणे शक्य नाही; त्या रस्त्यांवरील खड्डे चांगल्या दर्जाचे मटेरियल वापरून बुजवून घ्यावेत्त. माती/ दगडांचा वापर केल्यास अधिक त्रासदायक ठरतात. ९. न.प. गार्डनची दुरावस्था सुधारावी. नागरिकांची आर्थिक लुटमार होत आहे, ती थांबवावी. १०. बेकायदेशीर रित्या शहरातील ओपन स्पेसेस रिवाईज करून गुंडगिरी पद्धतीने ते विकण्याचे काम शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर चालू आहे यासंदर्भात स्पॉट इन्स्पेक्शन करून सखोल लक्ष घालण्याचे काम करावे. या विषयांवर प्रदीर्घ सविस्तर चर्चा करण्यात आली. योग्य त्या उपयोजना करण्यात येतील असे मुख्याधिकारी यांनी आश्वासित केले आहे. या बैठकीमध्ये बीड शहर बचाव मंचाच्या वतीने अध्यक्ष नितीन जायभाये, मार्गदर्शक प्राचार्य डी.जी तांदळे सर, निवृत्त पोलीस नि.गोरख दिवे , कार्य. सदस्य प्रा.व्ही एन सवासे, कार्य.सदस्य बाजीराव ढाकणे, सेवा नि.एस.डी निंबाळकर,शहर काजी हाफिज शेख मैनोद्दीन,एस.डी.पी.आय पार्टीचे एजाज चौधरी, सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे आदी सर्व पदाधिकारी,सदस्य उपस्थित होते.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)